क्रमांक : ११८६२ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२१

**संदर्भ :-** १) सा.प्र.वि.शा.नि.क्र.सीडीआर-१०८५/२५७९/४६/अकरा, दिनांक १५ जुलै, १९८६
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १७०५०/क-१, दिनांक २ एप्रिल, २००८
३) सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक:वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक २ जून, २०१४
४) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२२५३२/क-१, दिनांक २१ जुलै, २०१४
५) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२०८५/क-१, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५
६) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२०००१/क-१, दिनांक ३ मे, २०१६
७) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.५४५४/क-१, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१८
८) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.६७६१/क-१, दिनांक १ एप्रिल, २०१९
९) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१२९५४/क-१, दिनांक १८ सप्टेंबर, २०२०

**:: परिपत्रक ::**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९ च्या पोटनियम (१) व त्याखालील टीप ३ अनुसार व संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयाच्या अधिन राहून प्रत्येक शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्याने (गट-ड मधील कर्मचारी वगळता) विहीत नमुन्यामध्ये आपले मत्ता व दायित्व याबाबतचे विवरण सादर करणे बंधनकारक आहे. सदर मालमत्तेचे विवरणपत्र सादर करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.३ वरील शासन निर्णयाद्वारे सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) त्यांची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबद्दलची माहिती प्रपत्र-१ (अचल मालमत्तेचे विवरण), प्रपत्र- २ (चल मालमत्तेचे विवरण) व प्रपत्र- ३ (कर्जे व इतर दायित्वे) मध्ये त्या-त्या वर्षाच्या दिनांक ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या-त्या वर्षाच्या दिनांक ३१ मे पर्यंत 'क-१' (आस्थापना) कक्षाकडे सीलबंद लिफाफ्यात सादर करण्याबाबत या सचिवालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार, या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) त्यांची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबद्दलची माहिती सोबतच्या प्रपत्र-१ (अचल मालमत्तेचे विवरण), प्रपत्र- २ (चल मालमत्तेचे विवरण) व प्रपत्र- ३ (कर्जे व इतर दायित्वे) मध्ये **दिनांक ३१ मार्च, २०२१ च्या स्थितीस अनुसरून दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजीपर्यंत 'क-१' (आस्थापना) कक्षाकडे सीलबंद लिफाफ्यात सादर करावीत.**

या आदेशाप्रमाणे कोणतेही विवरण विहित कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणूक मानण्यात येईल व अशा गैरवर्तणूकीबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. तसेच अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्या-त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्तेचे विवरणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गतचा लाभ, नियमित पदोन्नती, प्रतिनियुक्ती व विदेश दौऱ्यास अनुमती दिली जाईल. **सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी याची नोंद घ्यावी व प्रत्येक वर्षी त्या वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन मालमत्तेचे विवरणपत्र विहित प्रपत्रात त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत आस्थापना कक्षास प्राप्त होईल, याची दक्षता घ्यावी.**

आदेशानुसार,

**(ऋतुराज ज. कुडतरकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

...२/-

\\file\...\Matta & Dayitva\Matta-Dayitv Circular.doc

**प्रति :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून)
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी
६) संगणक कक्ष
७) निवडनस्ती